# मराठी भाषा गौरव दिनाचे औचित्य साधून टिमवि ग्रंथालयात

# “मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे” आयोजन



सध्याच्या सोशल मीडियाच्या आणि कंम्प्युटरच्या जगात सुंदर अक्षरच नाही तर लेखनाचाही आपल्याला विसर पडला आहे. त्याकरिता टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या ग्रंथालय विभागामार्फत शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिपाई आणि विद्यार्थ्यांसाठी दि. २७ फेब्रुवारी २०२५ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त "मराठी हस्ताक्षर स्पर्धेचे"  आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यापीठातील विविध विभागांचा उत्स्फूर्त सहभाग पहावयास  मिळाला. त्यामध्ये विद्यार्थी – ४८, शिक्षक – १२, शिक्षकेत्तर कर्मचारी – २३ व शिपाई – ०७ अशा एकूण ९० स्पर्धकांनी स्पर्धेत सहभाग घेतला.

स्पर्धेचा उद्देश मराठी भाषेचा सुंदर व सुवाच्य लेखनाचा प्रचार व प्रसार करणे हा होता. सहभागी स्पर्धकांनी उत्कृष्ट हस्ताक्षराची झलक सादर केली. परीक्षकांनी लेखनाची सुबकता, स्पष्टता व शुद्ध

लेखन यावर आधारित निकाल जाहीर केल्यानंतर विजेत्यांना गौरव म्हणून ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागपर प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.